**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी - 411018
क्र.मातवि/८/कावि/२५/२०२१
दिनांक- ०८ / ०३ /२०२१

प्रति,
सर्व संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८

**विषयः- मनपा संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...**
**संदर्भः- श्री. विशाल तुळशीराम मिठे यांचे दिनांक 17/02/2020 रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये श्री. विशाल तुळशीराम मिठे यांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम(६०) मधील तरतुदीनुसार मनपातील विविध विभागांनी मनपा संकेतस्थळावर माहितीचे प्रकटीकरण करणे तसेच विविध माहिती (उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI बाबतची माहिती ) अपलोड करणे आवश्यक आहे. तथापी काही विभागांकडुन सदरची माहिती अपलोड / अपडेट केली जात नसुन ज्या विभागाची माहिती अपडेट/अपलोड केली जात नाही अशा विभागांमधील विभागप्रमुखांवर योग्य ती कारवाई करणेबाबत मा. आयुक्त सो. यांना कळविलेले आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरुन सर्व संबंधित विभागांना कळविणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे संकेतस्थळावर नागरिकांना मनपामधील विविध विभागांची माहिती सहजपणे उपलब्ध होणेकामी माहितीचे प्रकटीकरण तसेच निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI बाबतची माहिती त्वरित अपडेट/अपलोड करणेत यावी. सदरची माहिती विनाविलंब अपलोड / अपडेट होणेकामी सर्व संबंधित विभागांना प्रशिक्षण देऊन लॉगिन पासवर्ड यापुर्वीच देणेत आलेले आहेत. सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क साधुन पुनःश्च प्रशिक्षण घेऊन उपरोक्त माहिती संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध / अद्ययावत ठेवणेबाबत दक्षता घेणेत यावी.

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८